अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेचे श्री शाहू मंदिर महाविद्यालय, पुणे
आणि स्नेहवर्धन रिसर्च इन्स्टिट्युट, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित
आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय १५ वी परिषद



'जागतिक स्तरावर शाहू महाराज, महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान' या परिषदेत पुस्तकाचे प्रकाशन करताना डावीकडून सुषमा शिंदे, दुबई, डॉ. मधुमती कौन्जुल, मॉरिशस, डॉ. स्नेहल तावरे, डॉ. सदानंद मोरे, श्री. शशिकांतभाऊ सुतार, सौ. प्रमिलाताई गायकवाड, प्राचार्य डॉ. शोभा इंगवले, डॉ. लक्ष्मी झमन, मॉरिशस, श्री. विश्वदीप करमचंद, मॉरिशस




मा. श्री. उल्हासदादा पवार यांचा सत्कार करताना...




मा. डॉ. नीलम गोऱ्हे यांचा सत्कार करताना...



परिषदेच्या निमित्ताने आलेले सर्व निमंत्रित.

स्नेहवर्धन
प्रकाशन

ISBN 978-93-87628-50-2
9 789387 628502
Price₹160/- $3

स्नेहवर्धन प्रकाशन

# 15th INTERNATIONAL INTERDISCIPLINARY CONFERENCE
# १५वी आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद

**भाग एक**



## 'Contribution of Shahu Maharaj, Mahatma Phule and Dr. Babasaheb Ambedkar at National and International Levels'

## 'जागतिक स्तरावर शाहू महाराज, महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान'

संपादक
डॉ. स्नेहल तावरे
डॉ. शोभा इंगवले

१४) श्री शाहू महाराजांचा सकलजनवादी विचार — डॉ. वैशाली पवार /६३
१५) राजर्षी शाहू महाराजांचा सामाजिक दृष्टिकोण — डॉ. कल्पना गावडे /६७
१६) छत्रपती राजर्षी शाहू महाराज – सुधारणावादी समाजसुधारक आणि लोकनेते — डॉ. वंदना चव्हाण /७१
१७) जागतिक स्तरावर छत्रपती शाहू महाराज, महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान — डॉ. डी. एस. बोरकर /७५
१८) राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक क्षेत्रातील योगदान — डॉ. गणेश मालटे /७९
१९) स्त्री सरक्षण व स्त्री शिक्षणाचे आधारस्तंभ – छत्रपती राजर्षी शाहू महाराज — डॉ. शुभांगी कुऱ्हाडे /८३
२०) राजर्षी शाहू महाराज यांचे योगदान — डॉ. विक्रम जाधव /८७
२१) राजर्षी शाहू महाराज यांचे शैक्षणिक योगदान — डॉ. दीपक गायकवाड /९१
२२) राजर्षी शाहू महाराजांचे सामाजिक योगदान — डॉ. मंदा नांदुरकर /९५
२३) लोककल्याणकारी राजा : राजर्षी छत्रपती शाहू महाराज — डॉ. प्रतिभा घाग /९९
२४) समाजसुधारक राजर्षी शाहू महाराज यांचे बहुजनांसाठीचे शैक्षणिक क्षेत्रातील योगदान — डॉ. जगदीश खैरे /१०३
२५) छत्रपती शाहू महाराजांच्या कृती कार्यक्रमातील 'सामाजिक न्याय' — डॉ. माणिक सोनावणे /१०७
२६) शाहू महाराजांचे कलाप्रेम — डॉ. वैजयंतीमाला जाधव /१११
२७) राजर्षी शाहू महाराज यांचे क्रीडा योगदान — डॉ. सुदाम शेळके, प्रा. रूपेश थोपटे /११५
२८) राजर्षी शाहू यांचे शैक्षणिक योगदान — डॉ. सारिका बहिरट /११७
२९) राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे कृषी क्षेत्रातील योगदान — प्रा. प्रशांत आरसुळ /१२१
३०) जागतिक स्तरावर शाहू महाराज, महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान — प्रा. विवेक खटवटे /१२५
३१) छत्रपती शाहू महाराज : एक समाजक्रांतिकारक — प्रा. संगीता चव्हाणके /१२९
३२) जागतिक स्तरावर शाहू महाराज यांचे शैक्षणिक योगदान — प्रा. लक्ष्मण कोठावळे /१३३
३३) जागतिक कीर्तीचे असामान्य व्यक्तिमत्त्व – राजर्षी छत्रपती शाहू महाराज — प्रा. गौरी कुलकर्णी /१३६
३४) थोर विचारवंत शाहू – फुले – आंबेडकर — प्रा. निवृत्ती टार्फे /१४०
३५) श्री शाहू महाराज, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शिक्षण क्षेत्रातील योगदान — प्रा. रजनी जरांडे /१४४
३६) बहुजन शिक्षण उद्धारक : लोकराजा राजर्षी शाहू महाराज — प्रा. योगेश पाटील /१४८
३७) राजर्षी शाहू महाराज : शैक्षणिक व सामाजिक योगदान — प्रा. क्रांती पैठणकर /१५२
३८) राजर्षी शाहू महाराज यांचे समाज व विधी क्षेत्रातील योगदान — प्रा. वैशाली देठे /१५६
३९) राजश्री शाहू महाराजांचे सामाजिक योगदान — प्रा. सारिका कर्पे /१६०
४०) पर्यटनातून घडलेले एक दीपस्तंभ – राजर्षी छत्रपती शाहू महाराज — प्रा. संजयादेवी पवार (गोरे) /१६४
४१) छत्रपती शाहू महाराजांच्या विचारांनी प्रभावित झालेले कृष्णराव भेगडे यांचे शैक्षणिक योगदान — प्रा. वैशाली पाटील / १६८
४२) राजर्षी शाहू महाराज : एक युगप्रवर्तक — नीलिमा फाटक /१७२
४३) जागतिक स्तरावर शाहू महाराज यांचे योगदान — प्रियांका खरात /१७६
४४) राजर्षी शाहू महाराजांचे समर्थ वारसदार –छत्रपती राजाराम महाराज — नरेंद्र पाटील /१८०
४५) राजर्षी शाहू महाराज यांचे सामाजिक कार्य — शिवाजी कार्ले /१८४
४६) राजर्षी शाहू महाराजांचे योगदान — पूनम यादव /१८८

# शाहू महाराजांचे कलाप्रेम

**डॉ. वैजयंतीमाला जाधव**
**भ्रमणभाष : ८३०८८३९३३७**

राजर्षी शाहूंनी कोल्हापूर संस्थानात संगीत, चित्रपट, चित्रकला, लोककला आणि कुस्ती या क्षेत्रातील कलावंताना राजाश्रय देऊन त्यांना प्रोत्साहन देण्याचे महत्त्वाचे कार्य केले. कलेच्या प्रांतात महाराजांचे कार्य मौलिक स्वरूपाचे आहे. १८७४ ते १९२२ या कालखंडात शाहू महाराजांनी विविधांगी स्वरूपाचे कार्य केले. महाराष्ट्रातील नाट्यकलेला आश्रय देण्याचे आणि तिचा विकास होण्याचे श्रेय महाराजांना जाते. कोल्हापूरच्या आसपास अनेक नाटक मंडळ्या स्थिर होत होत्या. नरहरबुवा सरडे यांनी त्या काळात नाटक मंडळी सुरू केली. या कालखंडातील नाटके ही पौराणिकच स्वरूपाची होती. नाटकात देवांचा विजय आणि राक्षसांचा पराभव अशा प्रकारचा विषय होता. कोल्हापूरच्या नाट्य-संगीताच्या कारकिर्दीस शाहू महाराजांनी प्रोत्साहन दिले. १८८३ साली कोल्हापूरला गायन समाजाची स्थापना झाली. यामध्ये विसुभाऊ गोखले, त्र्यंबकराव दातार, केशवराव देवल अशी अनेक रसिक मंडळी होती. या समाजाच्या सभासदांमध्ये अनेक जहागीरदार, हौशी धनिक, गोखले न्यायाधीश वगैरे रसिक मंडळी होती. राजकारण आणि समाजकारणाच्या धकाधकीत माणसाचे जगणे समृद्ध करणाऱ्या कलेला शाहू महाराजांनी नेहमीच प्रोत्साहन दिले. शिल्पचित्र, गायनवादन कला इत्यादी कलांची शाहू महाराजांनी जोपासना केली.

रंगभूमीवरील अण्णासाहेब किर्लोस्कर, भाऊराव कोल्हटकर, गणपतराव जोशी, केशवराव भोसले, दत्तोपंत हल्याळकर, सिनेसृष्टीतील बाबुराव पेंटर, चित्रकला तपस्वी आबालाल रहिमान, गायिका सकवारबाई साहेबजान व सोपीजान ह्या बहिणी रंगभूमीचे नेपथ्यकार आनंदकार पेंटर, तबलजी दादा लाडू, बळवंतराव रुकडीकर, गणपत गुरव, पखवाजपटू सादलेबुवा, नाटककार नि पेटीवादनपटू गोविंदराव टेंबे, शाहीर लहरी हैदर आणि अनेक कलाकार हे कोल्हापूरमधून लौकिक प्राप्त झालेले आहे. शाहू महाराजांनी संगीत क्षेत्रातील कलावंताना वेळोवेळी प्रोत्साहन दिले. त्यांनी मदत केली. १८९५ मध्ये शाहू महाराजांनी अल्लादियाँखान यांना दरबारी गायक म्हणून नेमले. ते उत्तर हिंदुस्थानात अंत्रोली घराण्याची ख्यालगायकी महाराष्ट्रात आणून ती येथे अल्लादियाखाँन यांनी लोकप्रिय केली. कोल्हापूर दरबारी गायिका व नर्तकी म्हणून बाळाबाई ऊर्फ बाकाबाई बांदोडकर त्यावेळी कोल्हापूर

दरबारी होत्या. महमदखाँ व अल्लादियाँ यांच्याकडे त्यांनी गायनकलेचे शास्त्रोक्त शिक्षण घेतले. दुर्गा व दरबारी कानडा गाण्याबद्दल त्यांची विशेष प्रसिद्धी होती. शाहू महाराजांच्या काळात पं. भास्करबुवा बखले, मंजीखाँ सूरश्री केसरबाई केरकर व महाराष्ट्र कोकिळा शंकरराव सरनाईक इत्यादी गायक-गायिकांनी अल्लादिया खाँसाहेबांनी संगीताचे धडे दिले. महाराज चांगल्या दर्जाच्या गायक-गायिकांनी शिफारशीची पत्रे देऊन निरनिराळ्या संस्थानिकांकडे पाठवत. प्रसिद्ध गायकांचे शास्त्रोक्त संगीत महाराजांना ऐकायला आवडत असे. नाट्यसंगीत क्षेत्रातल्या कलावंताकडे शाहू महाराजांचे बारीक लक्ष होते. नारायण श्रीपाद राजहंस नावाच्या मुलावर, त्याला कमी ऐकू येत असल्याने महाराजांनी उपचारांची सोय केली. त्यांच्यातले कलागुण महाराजांनी ओळखले. पुढे हाच मुलगा 'राजहंस' म्हणून नावारूपाला आला. शाहू महाराजांच्या कला क्षेत्राच्या प्रोत्साहनामुळे सांस्कृतिक क्षेत्रात कोल्हापूर आघाडीवर राहिले. आबालाल रेहमान यांच्यानंतर कोल्हापूरमध्ये एकापेक्षा एक चांगले चित्रकार उदयास आले. 'राजर्षी शाहूंच्या दूरदृष्टीच्या कलाविचारामुळे कोल्हापुरात विविध ललित कलांच्या जाणकारानं इथला रसिक विलक्षण चोखंदळ घडला होता. कोल्हापुरात त्यावेळी कलासक्त मन असणं हे जणू समाजमनाचं कर्तव्य मानलं जायचं, त्या काळात सर्वसामान्य माणूसही अभिरुची संपन्न होत होता. त्यामुळे कलाविषयक उपक्रमांना इथे चांगलाच वाव मिळू लागला. अशा विविध व्यासपीठांवरून अनेक कलांचं सादरीकरण होऊ लागलं. राजा तर रसिकाग्रणी होता. लोकांच्या गुणग्राहकतेला त्यानं भरभरून दाद दिली. कोल्हापूर हा हा म्हणता कलेचं माहेरघर म्हणून साऱ्या देशभर प्रसिद्ध झाले.'[१] शाहू महाराजांचे नाट्यकलेवर पितृवत प्रेम होते. या नाटक कंपन्यांना शाहू महाराजांनी वेळोवेळी मदत केली. किर्लोस्कर नाटकमंडळी, शाहू नगरवासी नाट्य मंडळी, करवीर निवासिनी नाटक मंडळी, स्वदेश हितचिंतक नाटक मंडळी या सर्व नाटक मंडळांवर त्यांचा लोभ होता. करवीर नगरीत वेळोवेळी बोलावून त्यांना बिदागीही देत.

१९०२ साली शाहू महाराज ज्यावेळी विलायतेस गेले त्यावेळी रोम येथील कुस्ती मैदाने व नाट्यगृहे पाहून आल्यानंतर तशाच प्रकारची योजना कोल्हापूरमध्ये राबवली. खासबाग मैदान व पॅलेस थिएटर ही या योजनेची मूर्त रूपे आहेत. १८९२ साली देवल क्लबची स्थापना झाली. कोल्हापूर गायन समाजाचा चालक मंडळींनीच हा क्लब सुरू केला. या क्लबची कीर्ती महाराजांच्या कानावर गेली. येथल्या गायन समाजाच्या जागेची अडचण महाराजांनी दूर केली.

शाहू महाराजांच्या काळात कलागुणांची जोपासना करण्यात आली. प्रत्येकातील गुण हेरून त्यांनी कलावंतांना, चित्रकारांना, संगीत तज्ज्ञांना, शाहिरांना आश्रय दिला. अनेक शाहिरांना आणि शाहिरी गाण्यांच्या फडांना त्यांनी उदार हाताने मदत केली आणि महाराष्ट्रातील शाहिरी जागृत ठेवली.